Impact Factor – 6.625 E-ISSN – 2348-7143

Feb - 2021

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY


International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-February-March 2021

Vol.-VIII, Issue-I (B)

**Multidisciplinary Issue**




Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

176

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Vol.-VIII, Issue-I (B)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Jan.-March 2021

# भगतसिंग यांचे युवकांच्या संबंधीचे विचार

प्रा.डॉ.राजेंद्र नामदेव रासकर
इतिहास विभाग प्रमुख
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय औंध, पुणे–६७
E-mail.rajendraraskar2550@gmail.com
मोबाईल नंबर–९९६०६५९६८४

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

## प्रास्ताविक

भगतसिंग यांचा जन्म २८ सप्टेंबर १९०७ साली तत्कालीन पंजाब प्रांतातील ल्यालपूर जिल्हयातील बंगा गावात झाला. त्यांच्या आईचे नाव विद्यावती वडिलांचे नाव किशनसिंग होते. ज्यावेळेस त्यांच्या वडिलांची व दोन काकांची तुरुंगातून सुटका झाली. त्याच सुमारास भगतसिंग यांचा जन्म झाला. त्यांच्या कुटूंबातील बरेच सदस्य भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात सामील झाले होते. तर काही महाराजा रणजितसिंग यांच्या सैन्यात होते. त्यांचे अजोबा अर्जुनसिंग हे स्वामी दयानंद सरस्वती यांच्या हिंदू सुधारणावादी चळवळीत होते. आर्य समाजाचे सदस्य ही होते. त्यांच्या वयाच्या इतर शीख मुलांसारखे ते लाहोरच्या खालसा हायस्कूलमध्ये गेले नाहीत. त्यांच्या आजोबांना त्या शाळेतील लोकांची ब्रिटिश सरकारप्रती असलेली निष्ठा मंजूर नव्हती. बारा वर्ष वय असताना जालियनवाला बाग हत्याकांडाच्या नंतर भगतसिंगांनी ती जागा पाहिली. चौदा वर्ष वय असतांना गुरूद्वारात नानकसाहेब येथे अनेक लोकांना ठार मारल्याविरूध्दच्या आंदोलनात ते सामील झाले. महात्मा गांधीजींनी असहकार चळवळ बंद केल्यानंतर भगतसिंग यांचा अहिंसेच्यामार्गाबद्‌ल भ्रमनिरास झाला.[१]

त्यानंतर भगतसिंग युवा क्रांतीकारी चळवळीत सामील झाले होते. ब्रिटिश सरकारचा हिंसक मार्गाने पाडाव करण्यासाठीच्या विचारांचे समर्थक झाले. भगतसिंग यांनी विद्यार्थी व युवकांसाठी फार मोठा उपदेश केला आहे. विद्यार्थी व युवकांसाठी फार मोलाचा संदेश दिलेला आहे. त्यांना स्वातंत्र्याची तर प्राप्ती करावयाची होतीच पण स्वातंत्र्यानंतर समाजव्यवस्था कशी असली पाहिजे हे स्वप्न भगतसिंग यांनी पाहिले आहे. तरुण युवक व विद्यार्थी देशाचा कणा असतो. तरुण युवक देशासाठी आहुती देतील. त्यांची ताकद फार मोठी आहे हे भगतसिंग यांनी ओळखले होते. त्यामुळे देशातील विद्यार्थी–युवकांना त्यांनी सातत्याने मार्गदर्शन व उपदेश केले. तरुण–विद्यार्थी यांच्या संदर्भात त्यांची भूमिका पुढील प्रमाणे होती.

## पंजाबमधील विद्यार्थ्यांच्या परिषदेला संदेश

१९२९ साली लाहोरमध्ये पंजाबमधील विद्यार्थ्यांची दुसरी परिषद भरली होती. सुभाषचंद्र बोस परिषदेच्या अध्यक्षस्थानी होते. या परिषदेचे प्रतिनिधी म्हणून भगतसिंग व बटूकेश्वर दत्त यांना पाठवले होते. या परिषदमध्ये भगतसिंग यांनी पुढील संदेश दिला.

पिस्तुले बॉम्ब्स हाती घ्या असे आज आम्ही युवकांना सांगू शकत नाही आज विद्यार्थ्यांना फार महत्त्वाच्या कामाला सामोरे जावे लागणार आहे. देशाच्या इतिहासातील या कठिण काळात युवकांना आपल्या खांद्यावर फार मोठी जबाबदारी घ्यावी लागणार आहे. स्वातंत्र्याच्या लढ्यात आघाडीवर राहून विद्यार्थ्यांनी मृत्यूशी झुंज दिली आहे हे खरे आहे. या कसोटीच्या वेळी तोच करारी बाणा व आत्मविश्वास दाखवला ते डगमगणार काय? देशाच्या दूर कानाकोप–यापर्यंत युवकांना हा क्रांतीकारी संदेश पोचवला पाहिजे. औद्योगिक क्षेत्रातील झोपडपट्ट्यत राहणा–या आणि खेड्यांतील मोडक्यातोडक्या झोपड्यंत राहणा–या कोट्यवधी लोकांना त्यांना

177

प्रांत गणला जात आहे का? कारण जरी लढाऊ जमात (मार्शल रेस) म्हणून पंजाबची ख्याती असली तरी संघटना व शिस्त यांची आपल्याकडे उणीव आहे. तक्षशिलेच्या प्राचीन विद्यापीठाचा अभिमान बाळगत असलो तरी आज आपल्याला सुसंस्कृतपणाचा आभाव जाणवतो आहे. सुसंस्कृतपणासाठी समर्थ साहित्याची गरज असते आणि विकसित भाषा असल्याशिवाय असे साहित्य निर्माण होऊ शकत नाही. दुर्दैवाने आपलजवळ असे काहीच नाही.[५] भगतसिंग यांनी आपल्या देशासमोरचे अनेक प्रश्न मांडलेले आहेत. ते प्रश्न सोडविण्यासाठी देशभक्तांनी सातत्याने प्रयत्नांची शिकस्त केली पाहिजे.

### विद्यार्थ्यांना राजकारणामध्ये भाग घेण्याचा सल्ला

विद्यार्थ्यांना राजकारणामध्ये भाग घेण्याचा सल्ला जुलै १९२८ मध्ये राजकीय विचारावर आधारित एक लेख 'किरती' मध्ये छापला आहे. यात विद्यार्थ्यांना भगतसिंग यांनी पुढील प्रमाणे सल्ला दिलेला आहे.

विद्यार्थ्यांनी राजकीय कार्यात भाग घेऊ नये, या गोष्टीवर सहसा मोठी ओरड ऐकू येत आहे. याबाबत पंजाब सरकारचे मत तर अगदी विचित्रच आहे. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेण्याआधी राजकीय कार्यात भाग घेणार नाही, अशा आशयाच्या अटीवर त्यांच्याकडून सह्या करून घेतल्या जातात. तत्कालीन शिक्षणमंत्री शाळा–महाविद्यालयांना परिपत्रक काढतात व त्यामध्ये सुचित करतात की, शिकविणा–यांनी अथवा शिकणा–यांपैकी कोणीही राजकीय कार्यात भाग घेऊ नये परंतू शिक्षणमंत्र्याचे हे विचार भगतसिंग यांना आवडणारे नाहीत. खरे तर नवयुवक देशाची धुरा सांभाळणार आहेत त्यांची बुध्दी आजच पंगू बनविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. याचे भविष्यात काय परिणाम होतील हे आपणच समजून घेणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेणे हे त्यांचे मुख्य काम जरी असले तरी देशाच्या सद्यःस्थितीचे ज्ञान आणि ती सुधारण्याचे उपाय यांचा विचार करण्याची क्षमता विकसित करणे यांचा शिक्षणात समावेश असून नये.[६]

भगतसिंग यांनी राजकारणाविषयी स्पष्ट भूमिका मांडलेली आहे. विद्यार्थ्यांनी शिकावे परंतू राजकारणाचेही ज्ञान प्राप्त करावे वेळ येईल तेंव्हा मैदानात उतरावे, आपले जीवन याच कार्यासाठी खर्ची करावे असे आपले मत ठामपणे व्यक्त केले आहे.

### सारांश

भगतसिंग यांचा तरुणांवर फार मोठा विश्वास होता. तरुण समाजात निश्चित बदल घडवून आणतील कारण प्रत्येक समाजाचे भाग्यविधाते युवकच आहेत. कारण रक्त सांडायचे असेल त्यावेळी तरूणच पुढे येतील बलिदान करण्याची वेळ येईल त्यावेळी देखील आपणाला तरूणांकडेच आशेने पाहावे लागेल. कारण युवक हा देशाचा कणा आहे. जगाच्या इतिहासाची पाने उघडून पहा युवकांच्या रक्तांनी लिहिलेले संदेश पानोपानी दिसतील जगाच्या क्रांत्यांची आणि परिवर्तनाची वर्णने तपासून पाहिली तर त्यात देखील युवकांचेच योगदान आपणाला दिसेल. युवकांशिवाय देशाला स्वातंत्र्याची प्राप्ती होऊ शकणार नाही. इतके सामर्थ्य युवकांमध्ये आहे. असे भगतसिंग यांना वाटत होते.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh Pune-67 *

### संदर्भ सूची

१. डॉ. राणा भभगवान सिंह– भारत के महान अमर क्रांतीकारी भगतसिंह', प्रकाशक भारतीय ग्रंथ निकेतन नवी दिल्ली १९८८ पृष्ठ क्र.७
२. संपादक–गुप्ता डी.एन्. 'भगतसिंग निवडक भाषणे व लेखन' नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया २०१३ पृष्ठ क्रं. ३६

178